# भुयारीकरणाचा ३४वा टप्पा पूर्ण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मेट्रो-३ अर्थात कुलाबा-वांद्रे-सीप्झ या पहिल्या भुयारी मेट्रो मार्गावरील चर्चगेट ते हुतात्मा चौक या दोन स्थानकांदरम्यान ६४८ मीटर अंतराच्या भुयारीकरणाच्या ३४व्या टप्प्यातील काम शुक्रवारी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. एकूण ५०६ रिंग्जच्या सहाय्याने २९२ दिवसांत हे अप-लाइन मार्गाचे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले.

## २९२ दिवसांत लक्ष्य गाठले

सूर्या-१ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल-मोड हार्ड-रॉक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) स्पष्ट करण्यात आले.

मेट्रो-३ मार्गावर हुतात्मा चौक मेट्रो स्थानक महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या स्थानकामुळे चर्चगेट रेल्वे स्थानक, विविध देशांचे दूतावास, मुंबई उच्च न्यायालय, विविध बँका व वित्तीय संस्थांची मुख्यालये, बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज, बॅलार्ड इस्टेट, विविध रुग्णालये, महाविद्यालये, वानखेडे व ब्रेबॉर्न स्टेडियम, जहांगीर आर्ट गॅलरी, राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालय, एशियाटिक लायब्ररी, गेट वे ऑफ इंडिया व विविध उपाहारगृहे इत्यादी स्थळांना पोहचणे अधिक सोयीचे होणार आहे.




### ६१ टक्के बांधकाम झाले

पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश असून हुतात्मा चौक स्थानकाचे एकूण ५३ टक्के काम पूर्ण झाले आहे. पॅकेज-१ मध्ये एकूण ८१ टक्के भुयारीकरण आणि ७० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ८९ टक्के भुयारीकरण व ६१ टक्के बांधकाम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी दिली.